महाराष्ट्र वन विभाग
☎:०२२-२८६९२६६८/ २८६९२५९६
apccfwlmumbai@mahaforest.gov.in

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक
वन्यजीव पश्चिम प्रदेश मुंबई
जुनी एम.एच.बी. कॉलनी, एल.टी.रोड, बोरीवली
(पश्चिम), मुंबई - 400091

स्वारित श्रीराज्याभिषेक शके ३५०

जा.क्र.कक्ष-3/जमीन/FCA/प्र.क्र.120/ 626 /2024-25 दिनांक: 14 /11/2024

**पत्र/ईमेलव्दारे**

प्रति,
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव)
महाराष्ट्र राज्य, नागपूर

**विषय :-** (1) Request for issuance of certificate and certified map mentioning that the project boundary is located outside the ESZ/WLS and no Tiger /Elephant Corridor / Critical polluted Area falls in 10 kms of the proposed Bhavali Pumped Storage Project (1500 MW) Nashik and Thane Districts, Maharashtra.

(2) Bhavali PSP (1500 MW) Submission of revised Wildlife and Biodiversity Management Conservation Plan for approval – reg.

**संदर्भ :-** 1) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेकडील पत्र जा.क्र. कक्ष-23(2)/वजी/सर्व्हे/प्र.क्र.163/1293, दिनांक 15/07/2023 तसेच या कार्यालयाचे पत्र जा.क्र.कक्ष-3/ जमीन/FCA/प्र.क्र.120/1437, दि.09/10/2023.
2) उप वनसंरक्षक (वन्यजीव) नाशिक यांचेकडील पत्र जा.क्र. कक्ष-4/सर्व्हे/प्र.क्र. 15/392, दिनांक 11/06/2024.
3) या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष-3/जमीन/FCA/प्र.क्र.120/510, दिनांक 14/06/2024
4) उप वनसंरक्षक (वन्यजीव) नाशिक यांचेकडील पत्र जा.क्र. कक्ष-4/सर्व्हे/प्र.क्र. 15/772, दिनांक 10/09/2024.

विषयांकीत प्रकरणी कळसुबाई हरिश्चंद्रगड अभयारण्याच्या पर्यावरण संवेदनशील क्षेत्रालगत भावली पंप स्टोरेज प्रकल्प 1500 मेगावॅट हा नाशिक व ठाणे जिल्हयात प्रस्तावित आहे. त्याअनुषंगाने सदरचा प्रस्ताव मंजुरीकरीता अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेकडे सादर केला असून त्यांचेकडून संदर्भीय पत्र क्र. 1 अन्वये काही त्रुटी उपस्थित करण्यात आलेल्या होत्या. सदरच्या त्रुटींचा पुर्तता अहवाल सादर करणेकरीता या कार्यालयामार्फत संदर्भीय पृष्ठांकन क्र.1 अन्वये उपवनसंरक्षक (वन्यजीव) नाशिक यांना कळविले होते.

त्याअनुषंगाने उपवनसंरक्षक (वन्यजीव) नाशिक यांनी संदर्भीय पत्र क्र. 2 अन्वये भावली पंप स्टोरेज प्रकल्प हा 1:50000 प्रमाणाचे Survey Of India चे टोपोशिट नकाशावर कळसूबाई हरिशचंद्रगड अभयारण्याच्या पर्यावरण संवेदनशिल क्षेत्राच्या बाहेर असलेबाबतचे नकाशे या कार्यालयास सादर केले आहेत.

सदर प्रकरणी दि. 08/05/2024 रोजी सहा. वनसंरक्षक (वन्यजीव) कळसूबाई हरिश्चंद्रगड, वनपरिक्षेत्र अधिकारी (वन्यजीव) भंडारदरा, वनक्षेत्र सर्व्हेक्षक (वन्यजीव) नाशिक, पश्चिम भाग नाशिक वनविभागाचे सहा. वनसंरक्षक (वन्यजीव व रोहयो), वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा.) ईगतपुरी, वनसर्व्हेक्षक पश्चिम भाग नाशिक, वनपाल खैरगाव, वनरक्षक भावली व

वनरक्षक काळुस्ते तसेच सदर प्रकल्पाचे अधिकारी / कर्मचारी JWS Energy PSP Two Limited यांचे प्रतिनिधी समवेत जागेवर जाऊन सदरचा प्रकल्प कळसूबाई हरिश्चंद्रगड अभयारण्याच्या पर्यावरण संवेदनशिल क्षेत्रापासून 12.50 मी. दूर अंतरावर असल्याची खात्री केलेबाबतचा अहवाल सोबत सादर केला आहे. दिनांक 08/05/2024 रोजीचे पंचनामे व फोटोग्राफ्स उपवनसंरक्षक (वन्यजीव) नाशिक यांनी संदर्भीय पत्र क्र. 4 अन्वये या कार्यालयास अहवालासोबत सादर केले आहेत.

सदरचा प्रकल्प हा hydro project या प्रकारातला असल्यामुळे आणि तो कळसुबाई हरिश्चंद्रगड पर्यावरण संवेदनशील क्षेत्राच्या हद्दीपासून 12.50 मी. अंतरावर येत आहे. त्यामुळे त्यांना या प्रकरणात वन्यजीव संवर्धन आराखडा आवश्यक असल्याने उपवनसंरक्षक (वन्यजीव) नाशिक यांचे अभिप्राय व वन्यजीव संवर्धन आराखडा मागविण्यात आलेला होता.

त्याअनुषंगाने उपवनसंरक्षक (वन्यजीव) नाशिक यांनी आपलेमार्फत उपस्थित त्रुटींचा पूर्तता अहवाल व वन्यजीव संवर्धन आराखडा संदर्भीय पत्र क्र. 4 अन्वये या कार्यालयास सादर केला आहे. **सदर आराखड्याची तपासणी केली असता या कार्यालयाकडून खालीलप्रमाणे निरीक्षणे नोंदविण्यात येत आहेत :-**

1) सदरचे क्षेत्र कळसुबाई हरशिच्चंद्र गड पर्यावरण संवेदनशील क्षेत्राच्या हद्दीपासून 12.50 मीटर दूर अंतरावर आहे.
2) प्रस्तावासोबत Topographical Map जोडलेला आहे.
3) प्रस्तावासोबत Google Image सोबत सादर केली आहे.
4) सदर प्रस्तावामध्ये Animal Saftey साठी तरतूद केली आहे.
5) प्रकल्पाची एकुण रक्कम 8964.02 कोटी इतकी आहे.
6) Muck Management Plan सोबत सादर केला आहे.
7) KML फाईल सदर प्रस्तावासोबत जोडली आहे.
8) Cost of Wildlife and Biodiversity Management Plan ची रक्कम 315.05 लाख इतकी आहे.

उप वनसंरक्षक (वन्यजीव) नाशिक यांनी संदर्भीय पत्र क्र.4 अन्वये सादर केलेला वन्यजीव आणि जैवविविधता व्यवस्थापन संवर्धन आराखडयाची प्रत पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी आपलेकडे सादर करण्यात येत आहे.

**सहपत्र**- वरीलप्रमाणे.

**(डॉ.व्ही.क्लेमेंट बेन)**
**अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक**
**वन्यजीव पश्चिम प्रदेश,**
**मुंबई.**

प्रत : उप वनसंरक्षक (वन्यजीव) नाशिक यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी.

प्रत : JSW Energy PSP Two Ltd यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी.